॥ शूर शिपाई ॥

कवि केशवसुत

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे! ॥ धृ॥

ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा,
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा!
खादाड असे माझी भूक,
चतकोराने मला न सूख,
कूपातिल मी नच मंडूक;
मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे!
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे! ॥ १॥

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत,
कोठेही जा पायाखाली तृणावृता भू दिसते,
कोठेही जा डोईवरते दिसते नीलांबर ते!
सावलीत गोजिरी मुले,
उन्हात दिसती गोड फुले,
बघता मन हर्षून डुले;
ती माझी, मी त्यांचा, एकच ओघ अम्हातुनि वाहे!
नव्या मनूतिल ..... ॥ २॥

पूजितसे मी कवणाला? तर मी पूजी अपुल्याला,
आपल्यामधे विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला;
' मी' हा शब्दच मजला न लगे, संपुष्टी हे लोक,
आणुनि तो, निजशिरी ओढिती अनर्थ भलते देख!
लहान- मोठे मज न कळे,
साधु- अधम हे द्वयहि गळे,
दूर- जवळ हा भाव पळे;
सर्वच मोठे- साधु- जवळ, त्या सकली मी भरुनी राहे!
कोण मला .... ॥ ३॥

हलवा करिता तिळावर जसे कण चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केंद्राभवते वेष्टन तेवि जडाचे;
आत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक,
परि अन्या बोचाया धरिती काटे की प्रत्येक!
अशी स्थिती ही असे जनी!
कलह कसा जाइल मिटुनी?
चिंता वाटे हीच मनी,
शांतीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा, नव्या दमाचा शूर शिपाई आहे! ॥ ४ ॥

पाच कवी: संपादक मं. वि. राजाध्यक्ष .
या पुस्तकात केशवसुत, ना. वा. टिळक, विनायक, गोविंदाग्रज
आणि बालकवी यांच्या कविता आहेत.

प्रेषक: अविनाश साठये(sohum@ms.uky.edu)